मुख्य संपादक
**विश्वनाथ जयसिंग पाटील**

संपादक
**डॉ.जया विश्वनाथ पाटील**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत साताप्पा साठे**

लेखन साहाय्य
**किरणकुमार कसुळे**

मुखपृष्ठ मांडणी
**रसिका सागवेकर**

मांडणी
**अपूर्वा शिंदे**

मुद्रितशोधन
**प्रज्ञा भोसले**

अभिप्राय, सूचना व मागणी
संपर्क
**'पृथ्वी पब्लिकेशन',**
**१५३६, सदाशिव पेठ, पुणे ३०.**
**: 8390554161**
: admin@prithvi.net.in

'यशाची परिक्रमा' हे मासिक मालक, 'पृथ्वी पब्लिकेशन' यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विश्वनाथ जयसिंग पाटील यांनी सकाळ मीडिया प्रा.लि.पुणे येथे छापून १५३६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

**नमस्कार,**

यशस्वी होण्यासाठी कष्टाला पर्याय नाही. परंतु कष्ट करणे, मेहनत करणे म्हणजे नेमके काय करायचे याची स्पष्टता मात्र असायला हवी. ती नसेल तर केलेले कष्ट आणि मेहनत वाया जाते. 'स्मार्ट वर्क' करावे असे आपण नेहमी ऐकतो. पण ते करायचे कसे? त्याचा एकच एक फॉर्म्युला नाही. पण उपलब्ध साधने आणि वेळ यांचा सर्वोत्तम वापर करण्याची पद्धत म्हणजे 'स्मार्ट वर्क'. ते करताना कसलाच ताण येत नाही. ते करताना आपण अत्यंत कार्यक्षम आणि उत्साही असतो. थोडक्यात 'स्मार्ट वर्क' करण्यासाठी 'स्मार्ट मानसिकता' फार आवश्यक आहे.

राज्यसेवा पूर्व आणि संयुक्त गट ब पूर्व या परीक्षा होणार हे नक्की झाल्यानंतर आळस झटकून सगळेच कार्यमग्न झाले आहेत. तब्बल एक वर्षाच्या अनिश्चिततेनंतर सगळे वेळापत्रक पुन्हा रुळावर येत आहे. अशा परिस्थितीत अभ्यासाला नवी गती देऊन योग्य दिशेने पाऊले उचलली तर मुख्य परीक्षेचा प्रवेश नक्की करता येईल. त्यासाठी गती आणि दिशा यांचे संतुलन साधणे जमायला हवे. सरावाच्या बाबतीत जो चालढकलपणा आला असेल तो थांबवून नियमित सराव करायला हवा. त्यासाठी सराव चाचण्या सोडविण्यावर भर द्यायला हवा.

सराव चाचण्या सोडवत असताना किती गुण मिळतात यापेक्षा आपली तयारी कितपत झाली आहे हे तपासणे गरजेचे आहे. जे प्रश्न बरोबर आले त्यापेक्षा जे प्रश्न चुकले आणि जे सोडविता आले नाहीत त्यांचे मूल्यमापन जास्त गरजेचे आहे. आपला प्रश्न चुकला असेल तर का चुकला? सोडविला नसेल तर का सोडविता आला नाही? याची उत्तरे मिळवायला हवीत. त्यातून ज्या चुका सापडला त्या दुरुस्त करण्याचा कृतिकार्यक्रम आखून त्याची काटेकोर अंमलबजावणी व्हायला हवी.

राज्यसेवा परीक्षेतून तहसिलदार या पदी निवड झालेले 'पृथ्वी अकॅडमी'चे विद्यार्थी निरंजन कदम यांची यशोगाथा या अंकात समाविष्ट केली आहे. ती आपणास प्रेरणादायी ठरेल. तुमच्या यशासाठी 'शेर्पा' सदैव तुमच्यासोबत आहे.

आपल्या सूचना व अभिप्राय यांचे सदैव स्वागत आहे.

आपला
**संपादक**

फेब्रुवारी २०२१
यशाची परिक्रमा
MPSC/UPSC परीक्षांसाठी मासिक
PRITHVI academy

# अनुक्रम

**वृत्त परिक्रमा**
'म्यानमार'मधील सत्तासंघर्ष ...५

**चालू घडामोडी**
राजकीय व घटनात्मक ...८
जागतिक घडामोडी ...१४
महाराष्ट्र ...२७
आर्थिक घडामोडी ...३१
सामाजिक घडामोडी ...५०
पर्यावरण ...६२
विज्ञान व तंत्रज्ञान ...७४
संरक्षण व अंतरिक्ष ...७९
पुरस्कार व पुस्तके ...८८
क्रीडा घडामोडी ...९४
नेट प्रॅक्टिस ...९७

**यशोगाथा**
निरंजन तुकाराम कदम (तहसिलदार) ...९९

**विशेष परिक्रमा**
शेतकरी आंदोलन ...१०१

**शेर्पा**
नेतृत्वाची खूण ...१०६

शेर्पा

# नेतृत्वाची खूण

प्रत्येक यशस्वी संघटनेच्या, संस्थेच्या यशात नेतृत्वाचा वाटा सर्वात मोठा. पण नेतृत्व नेमके कसे असते? याविषयी मतमतांतरे आढळतात. व्यक्तीसापेक्ष, कालसापेक्ष नेतृत्वाविषयी मांडल्या जाणाऱ्या गुणांची संख्या कमी जास्त होत राहत असेल; पण एक गोष्ट नक्की ती म्हणजे यशस्वी बनवते ते नेतृत्व. यशाची पताकाच ज्याच्या हाती असते तो नेता असेच सर्वमान्य झाले आहे. काही दिवसांपूर्वी अशाच एका यशस्वी नेत्याला भेटण्याचा योग आला. खरंतर समोरासमोर भेट होऊ शकली नाही. कितीही प्रयत्न केला तरी ती होण्याची शक्यताही कमीच वाटते. पण एवढे प्रभावी नेतृत्व आजवर तरी माझ्या पाहण्यात आले नाही.

आमच्या माळरानावर तशी फारशी झाडेझुडूपे नाहीत. माळरानाच्या एक बाजूला मंदिरात बसलाय विठ्ठल. त्या मंदिराच्या शेजारीच विठ्ठलावर सावली धरणारा त्याचा एक सोबती आहे. माझ्या आजोबांच्या बालपणाच्या आधीपासूनच तो तिथे आहे. तो आहे एक महाकाय वटवृक्ष. त्याचा विस्तार प्रचंड मोठा झाला आहे. त्याचे सर्वात आधीचे खोड कोणते ते शोधूनही सापडणे अवघड आहे. या वटवृक्षाच्या फांद्यांवर शेकडो पक्षी नेहमीच आढळतात. जेव्हा पाहावे तेव्हा तो हिरवागारच दिसतो. अगदी पाऊस कमी असणाऱ्या किंवा दुष्काळ असणाऱ्या वर्षी देखील तो बहरलेलाच असतो. हा वटवृक्ष एखाद्या महाकाय संघटनेसारखाच वाटतो. त्याच्या असंख्य शाखा, उपशाखा म्हणजे त्या संघटनेचे जणू सक्रिय आधारस्तंभच असावेत. या वटवृक्षाच्या शाखा उपशाखांची एकमेकांत झालेली गुंफण हेच कदाचित या संघटनारूपी वृक्षाच्या सदाबहार असण्याचे रहस्य असावे.

या अत्यंत यशस्वी संघटनेचा नेता कोण असेल बरे? एवढा महाकाय वटवृक्ष सांभाळायचा, त्याची वाढ सुरू ठेवायची तर नेतृत्वही तेवढेच सक्षम असायला हवे. या नेतृत्वालाच भेटायचा प्रयत्न मी कित्येक वेळेस केलाय. पण माझी आणि त्याची अजून समोरासमोर भेटच होऊ शकलेली नाही. ती होईल असेही सांगता येत नाही. पण त्याचा ठावठिकाणा मात्र मला सापडलाय. या महाकाय वाढलेल्या वटवृक्षाच्या खालीच त्याचे नेतृत्व सतत कार्यमग्न आहे. या वटवृक्षरूपी संघटनेचे सर्वांना दिसणारे विस्तीर्ण असे यश जेवढे महाकाय आहे त्यापेक्षाही त्याचे नेतृत्व महाप्रचंड आहे. दृश्य स्वरूपातील विस्तीर्ण यशापासून दूर परंतु त्या यशाला सदैव तोलून धरणारे हे नेतृत्व जमिनीत खोलवर पसरले आहे. पृथ्वीच्या गर्भातील खोल अंधारात ते मूळांच्या रूपाने नव्या वाटा शोधत आहे. जमिनीच्या वर दिसणाऱ्या यशाची पताका कुणाच्या खांद्यावर आहे याची या नेतृत्वाला कसलीच फिकीर नाही.


**यशाची परिक्रमा**

**वर्गणीदार होण्यासाठी**

**• पर्याय १ •**
**www.prithvi.net.in**
**या वेबसाईटवर जाऊन**
**वर्गणी थेट ऑनलाईन भरा.**

**• पर्याय २ •**
**कोड स्कॅन करा**

- १ व्यक्ती स्वतंत्रपणे किंवा एकपेक्षा जास्त २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९... अशा गटानेही वर्गणी भरता येईल.
- वर्गणीचे वार्षिक दर
  १ व्यक्ती=१०००रु.; २ व्यक्ती=१५००रु.; ३ व्यक्ती=२०००रु.;
  ४ व्यक्ती=२५००रु.; ५ व्यक्ती=३०००रु. असे प्रती व्यक्ती ५०० रु. वाढ होईल.
- वर्गणी भरलेल्या महिन्यापासून १२ महिने अंक पाठविले जातील.
- आधीच्या महिन्यापासून वर्गणी सुरू करायची असेल तर वर्गणी भरल्यावर info@prithvi.net.in वर तसा मेल करावा.
- २ आणि त्यापेक्षा जास्त जणांसाठी एकत्र वर्गणी असल्यास सर्व अंक दरमहा एकाच पत्त्यावर एकाच पार्सलने एकत्र पाठविले जातील.